**प्रेसनोट दि.२७/०३/२०१९**

**सिंहगड रोड पो.स्टे.पुणे शहर**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत न-हे पोलीस चौकीचे हद्दीतील सोसायटयांमध्ये कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने जनजागृती**

दि.२६/०३/२०१९ रोजी सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत नहे पोलीस चौकी प्रभारी सहा.पोलीस निरीक्षक, एस.डी.पाटील व पोलीस उप-निरीक्षक,जे.एस.मोहीते यांनी कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने न-हे पोलीस चौकी हद्दीतील सुश्रृत सोसायटी तसेच मानाजीनगर,न-हे भागातील शांतीयुगा बिल्डींग रहिवाशी प्रविण अव्हेन्यु बिल्डींग रहिवाशी यांची बैठक आयोजीत केली. सदर मिटींग मध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप / योजना कार्यान्वीत असुन, त्या संदर्भात उपस्थित रहिवाशी यांना माहीती सांगण्यात आली. सिंहगड रोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता घरफोडी चोरी, चैन स्नैचींग, सायबरचे गुन्हे यासंदर्भात उपस्थित रहिवाशांना माहिती देवुन,त्यांचे प्रश्न ऐकुन घेवुन,त्यांचे समस्यांचे निराकरण करुन,त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थित रहिवाशांना महिलांची व मुलांचे सुरक्षितते बाबत योग्य त्या सुचना देण्यात आल्या. कोणत्याही अडचणी आल्यास त्वरीत सिंहगडरोड पो. स्टे. अथवा १०० नंबरवर कॉल करुन पोलीस कंट्रोल रुम येथे कळवावे. आपल्या आजु-बाजुस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे. त्यांना त्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला ८० ते ९० रहिवाशी हजर होते.

( डी.व्ही.पवार )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सिंहगड रोड पो.स्टे.पुणे शहर

# <u>सिंहगडरोड पो.ठाणे प्रेसनोट दि. २६/०३/२०१९</u>

## *सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत वडगाव पोलीस चौकीचे हद्दीतील सोसायटयांमध्ये कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने जनजागृती*

---

दि. २६/०३/२०१९ रोजी सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत वडगाव पोलीस चौकी प्रभारी सहा.पोलीस निरीक्षक एस.व्ही.उमरे व पोलीस उप-निरीक्षक व्ही.जे. महांगडे यांनी कम्युनिटी पोलीसींगचे अनुषंगाने वडगाव पोलीस चौकी हद्दीतील जाधव नगर भागातील सुविधा ज्ञानगंगा सोसायटी रहिवाशी यांची बैठक आयोजीत केली. सदर मिटींगमध्ये पुणे पोलीस आयुक्तालयाकडून कम्युनिटी पोलीसींग संदर्भात एकुण १४ ॲप/योजना कार्यान्वीत असून त्या संदर्भात उपस्थित रहिवाशी यांना माहीती सांगण्यात आली. सिंहगडरोड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रहिवाशांच्या सुरक्षेकरीता घरफोडी चोरी, चैन स्नैचींग, ऑनलाईन फ्रॉड, तसेच महिला व मुलींना छेडछाड, सायबरचे गुन्हे यासंदर्भात उपस्थित रहिवाशांना माहिती देवुन त्यांचे प्रश्न ऐकुन घेवुन त्यांचे समस्यांचे निराकरण करुन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थित रहिवाशांना महिलांची व मुलांचे सुरक्षिततेबाबत योग्य त्या मार्गदर्शक सुचना देण्यात आल्या. कोणत्याही अडचणी आल्यास १०० नंबर वर कॉल केल्यास ५ ते १० मिनीटात दामिणी पथक, बिट मार्शलचे पोलीस कर्मचारी उपलब्ध होतात याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या आजुबाजूस कोणी संशयीत व्यक्ती आढळल्यास ताबडतोब पोलीसांना कळविण्यात यावे याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले. सदर मिटींगला ६० ते ७० रहिवाशी हजर होते.

( डी.व्ही. पवार )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सिंहगडरोड पो.स्टे.पुणे शहर